# महाराष्ट्र शासन

संकीर्ण-~~०७७७~~/प्र.क्र.१५३/१४/अधिनियम
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
नवीन मंत्रालय, ७ वा मजला,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक : २५.०६.२०१४.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी
सर्व पोलीस आयुक्त
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक

विषय : इलेक्ट्रोपॅथी व इलेक्ट्रोहोमिओपॅथी मधील व्यवसाय करण्याबाबत ...

संदर्भ :
१. शासनाचे पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक एमआयएस-१०९१/१२३३/----/९१/ अधिनियम, दि.३०.०३.१९९४.
२. शासनाचे पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक एमआयएस-२००३/१९८६/प्र.क्र.३९१/०३/अधिनियम, दि.०७.०१.२००४.
३. शासनाचे पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक एमआयएस-१०१०/प्र.क्र.२२१/ अधिनियम, दि.१८.११.२०१०.
४. मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ५५२६/१९९५, श्री.नागेश्वर बसंतराम दुबे विरुध्द भारतीय संघराज्य व इतर, याप्रकरणी दि.२२.१२.२००६ रोजी दिलेला न्यायनिर्णय.
५. मा.मुबई उच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रिट याचिका क्र.१०६३/२००६ या प्रकरणी दिनांक १७.०७.२००७ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

शासनाच्या दिनांक १८.११.२०१० रोजीच्या संदर्भाधीन पत्रात परिच्छेद क्रमांक (५) नंतर खालीलप्रमाणे परिच्छेद क्रमांक (६), याद्वारे, समाविष्ट करण्यात येत आहे.

"(६) तथापि, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्यादिनांक २२.१२.२००६ रोजीच्या संदर्भाधीन न्यायनिर्णयातील परिच्छेद क्रमांक ३१ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संदर्भाधीन रिट याचिका क्रमांक ५५२६/१९९५ मधील आणि मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १७.०७.२००७

रोजीच्या न्यायनिर्णयाप्रमाणे संदर्भाधीन रिट याचिका क्रमांक १०६३/२००६ मधील असे याचिकाकर्ते की जे इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोहोमिओपॅथी मधील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदवीका धारण करतात, ते महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम-१९६१ अंतर्गत नोंदणीशिवाय, खालील अटींच्या अधीन, इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोथेरपीचा व्यवसाय करु शकतील.

अटी :-

i. उक्त व्यक्ती हे वैद्यक व्यवसायी म्हणून मानण्यात येणार नाहीत किंवा त्यांना वैद्यक व्यवसायी असल्याचा दावा करता येणार नाही.

ii. उक्त व्यक्ती आपल्या नावापुढे वा नंतर "डॉक्टर" किंवा तत्सम पदवी लावू शकणार नाहीत."

आपल्या सुलभ संदर्भासाठी शासनाच्या दिनांक १८.११.२०१० रोजीच्या संदर्भाधीन पत्राची प्रत यासोबत पाठवित आहे.

(य.श. गायकवाड)
शासनाचे उप सचिव

प्रत, माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. आयुष संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, मुंबई

## महाराष्ट्र शासन

क्र.एमसीआयएम १०१०/प्र.क्र.२२१ /अधिनियम
वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०१०

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधिक्षक

विषय:- इलेक्ट्रोपॅथी/होमिओ इलेक्ट्रोपॅथी या चिकित्सा पध्दतीनुसार वैद्यकीय व्यवसाय न करण्याबाबतच्या सूचना.

संदर्भ:- १) क्र.एमआयएस १०९१/१२३३/(२००)/९१/अधिनियम, दिनांक ३० मार्च, १९९४ चे पत्र.
२) शासन परिपत्रक क्रमांक एमआयएस २००३/१९८६/ प्र.क्र.३५१/ ०३/अधिनियम, दिनांक ७ जानेवारी, २००४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

२. इलेक्ट्रोपॅथी/होमिओ इलेक्ट्रोपॅथी अभ्यासक्रमास शासनाची मान्यता नसताना व त्याआधारावर योग्य ते अधिकृत वैद्यकीय व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र नसतानाही ज्या व्यक्ती वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत त्याचेविरुध्द महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९६१ चे कलम ३३ व ३३-ए अन्वये तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश संदर्भाधिन दिनांक ३० मार्च, १९९४ च्या पत्राव्दारे देण्यात आलेले आहेत.

३. केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २००३ च्या आदेशाव्दारे दिलेल्या सूचना विचारात घेऊन ॲलोपॅथी, आयुर्वेद, सिध्द-युनानी व होमिओपॅथी तसेच योग-निसर्गोपचार या चिकित्सा पध्दतीखेरीज अन्य चिकित्सापध्दतीत शिक्षण देणाऱ्या संस्था बंद करण्याचे निर्देश संदर्भाधीन क्रमांक २ च्या परिपत्रकानुसार देण्यात आलेले आहेत. केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दिनांक ५ मे, २०१० च्या आदेशाव्दारे पुन्हा त्याच सूचना देण्यात आलेल्या आहेत.

४. मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ५५२६/१९९५ व इतर याचिकांवर दिनांक २२ डिसेंबर, २००६ रोजी एकत्रित आदेश पारित केलेला आहे. सदर आदेशात इलेक्ट्रोपॅथी/होमिओ इलेक्ट्रोपॅथी चा व्यवसाय करणारे व्यवसायी आपल्या नावासमोर डॉक्टर अथवा तत्सम (हकीम, वैद्य इ.) पदनाम लावून व्यवसाय करीत असल्यास त्यांची सदर कृती महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९६१ मधील

A(1 १०।१८४

तरतूदीनुसार कार्यवाहीस पात्र ठरतील असे स्पष्ट केलेले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७/२/२००९ च्या आदेशाव्दारे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दिनांक २२/१२/२००६ चे आदेश कायम ठेवलेले आहेत. यापुढे अशा गैरव्यवसायीकांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

५. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, इलेक्ट्रोपॅथी/होमिओ इलेक्ट्रोपॅथी मध्ये डॉक्टर व तत्सम पदनाम लावून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांविरुध्द <u>बोगस डॉक्टर म्हणून</u> फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

( कां. वि. पंडित )
शासनाचे उप सचिव

प्रत:- संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन
संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई
उप सचिव (आयुर्वेद) वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई